"सामान्यांसाठी शिक्षण"
स्थापना १९६७

ISSN 2349-638x
Impact Factor 5.707



ICSSR, New Delhi Sponsored

National Level Seminar in Interdisciplinary subject

# FINANCIAL LITERACY AND DIGITAL PAYMENT SYSTEM IN INDIA

Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgaon (Kale), Tq.& Dist. Latur


Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## VASANTRAO KALE MAHAVIDYALAYA,

DHOKI, TQ. & DIST. OSMANABAD. (MS)

**Saturday, 28th December 2019**






**Pri. Dr. Haridas Fere**
**Chief Editor**

**Dr. Balasaheb Maind**
**Editor**

Organized By
**Department of Economics**
**Vasantrao Kale Mahavidyalaya, Dhoki**
Tq. & Dist. Osmanabad (MS).

**Vol. II**

| Sr. No. | Name of Author | Title Of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 76. | आर. डी. गणापुरे<br>डी. पी. बिराजदार | आर्थिक साक्षरता आणि भारतीयांची गुंतवणूक प्रवृत्ती | 232 |
| 77. | ज्योती ललित अधाने | डिजिटल इंडिया व वित्तीय समावेशन | 236 |
| 78. | डॉ.ज्ञानेश्वर जिगे | रोकड विरहित अर्थव्यवस्था : भारताच्या संदर्भात संधी आणि आव्हाने | 240 |
| 79. | डॉ. सुनिल अण्णा गोरडे | राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) प्रणालीचे एक अर्थशास्त्रीय विश्लेषण | 242 |
| 80. | डॉ.प्रमोद बालाजीराव बेरळीकर | कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्था | 244 |
| 81. | प्रा. डॉ. अनंत नरवडे | रोकडविरहित अर्थव्यवस्था- समस्या आणि उपाय | 246 |
| 82. | गोविंद रामराव काळे<br>डॉ. दिपक एम. भारती | भारतातील रोकडविरहीत व्यवहार : एक आव्हाण | 249 |
| 83. | प्रा. डॉ. ए. टी. शेवाळे | भारतातील ई-कॉमर्स - आर्थिक व्यवहार व विनिमय | 251 |
| 84. | प्राचार्य डॉ. हरिदास फेरे<br>डॉ. बी.व्ही. मैंद | भारतातील डिजिटलायझेशन आणि डिजिटल पेमेंट सिस्टिम एक अभ्यास | 254 |
| 85. | डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार | रोकडरहित अर्थव्यवस्था व रोकडरहित व्यवहाराचे विविध पर्याय | 256 |
| 86. | श्यामराव लक्ष्मण वासनीकर<br>प्रा डॉ. विजय भोपाळे | कॅशलेस अर्थव्यवस्था आव्हाने आणि उपाय | 259 |
| 87. | डॉ. एस.एस.देवनाळकर | डिजीटल पेमेंट सिस्टिमचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 261 |
| 88. | एम. एस. बिडवे | डिजीटल ग्रंथालय, साहित्य सादरीकरण व शोधप्रक्रिया : एक अभ्यास | 263 |
| 89. | डॉ. मिनाश्री भास्कर जाधव | डिजिटल साक्षरता आणि भारतीय अर्थव्यवस्था | 266 |
| 90. | राहुल शिवाजी तिगोटे<br>डॉ. दीपक भुसारे | काळया पैशाला लगाम : रोखरहित अर्थव्यवस्था | 269 |
| 91. | आकाशनाथ दत्तात्रय बोरकर,<br>डॉ. एन.के.मुळे | निश्चिलनीकरण आणि रोकडविरहित अर्थव्यवस्था | 271 |
| 92. | डॉ. कार्तिक पोळ<br>प्रा. प्रमोद मुळे | रोकड विरहित व्यवहारात सरकारने केलेले प्रयत्न | 276 |
| 93. | प्रा. आचार्य बालाजी वैजनाथराव | रोख विरहीत व्यवहार : आव्हाने व उपाय | 278 |
| 94. | डॉ. ए. एच. अत्तार | डिजिटल इंडिया मोहीम : एक आर्थिक क्रांती | 281 |

# कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्था

डॉ.प्रमोद बालाजीराव बेरळीकर
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी पाचशे व हजाराच्या नोटा रद्द केल्या. एकुण त्या नोटा होत्या ८५ टक्के इतक्या होत्या. चलनातून रद्द केलेल्या नोटाचा इतिहास पाहिला तर १९४६ मध्ये फारच कमी नोटा चलनातून रद्द केल्या. १९७८ मध्ये एक, पाच व दहा हजार रुपयाच्या नोटा रद्द केल्या. नोटा रद्द किंवा बाद करण्याचा मुख्य उद्देश काळा पैसा अर्थव्यवस्थेतून बाहेर काढणे हा होता. याशिवाय बनावट नोटांचे उच्चाटन करणे, दहशतवाद्यांना मिळणाऱ्या पैशाचा मार्ग बंद करणे तसेच सरकारकडे जमा झालेली रक्कम प्रधानमंत्री गरीब कल्याण योजने अंतर्गत गोरगरीबांना मदत करण्यासाठी वापरणे.

नोटा रद्द करण्याबरोबरच सरकारने २०१६ पासून कार्ड व डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन दिले. रोखमुक्त अर्थव्यवस्था कशी निर्माण होईल या दृष्टीने रोखी ऐवजी ऑनलाईन व्यवहार, डिजिटल व्यवहार, इंटरनेट बँकींग, कार्ड ने व्यवहार (क्रेडिट व डेबिट कार्ड) स्मार्ट फोन, मोबाईल फोन यावरून व्यवहार, युपीआय व ई वॅलेट वापर करून भारतीय अर्थव्यवस्था रोखमुक्त कशी होईल याकडे लक्ष दिले. शासनाने केलेली नोटबंदीची चळवळ ही कॅशलेस व्यवहाराच्या भल्यासाठीच आहे असे घोषित केले. आजही सन २०११ च्या आकडेवारीनुसार ग्रामीण भागात ८३.३० कोटी लोकसंख्या वास्तव करते हे प्रमाण एकुण लोकसंख्येच्या ६८.८४ टक्के आहे. तसेच ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था कृषीशी जोडलेली आहे. आजही एकुण रोजगारापैकी कृषी क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या रोजगाराचे प्रमाण ५८ टक्के आहे. अशा संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर कॅशलेस व्यवहार कितीपत साध्य होईल. ग्रामीण अर्थव्यवस्थेत कॅशलेस व्यवहार करत असताना काय परिणाम होतील याचा उहापोह करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधातून केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दीष्ट्ये :-**

कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्था या शोधनिबंधाचे उद्दीष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) कॅशलेस व्यवहाराचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणामाचा अभ्यास करणे.

२) कॅशलेस व्यवहार करत असताना ग्रामीण अर्थव्यवस्थेतील लोकसंख्येला कोणत्या प्रश्नांना सामोरे जावे लागते याचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण अर्थव्यवस्थेतील गरीबी आणि निरक्षरता याचा कॅशलेश व्यवहारावर काय परिणाम होतो याचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहीतके :-**

कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्था हा शोधनिबंध लिहिताना खालील गृहितके गृहीत धरली आहेत.

१) ग्रामीण अर्थव्यवस्थेत कॅशलेस व्यवहाराला सुरूवात होत आहे.

२) सरकारच्या विविध योजनासाठी कॅशलेस व्यवहार वापरला जात आहे.

३) ग्रामीण भागातील इंटरनेट जोडण्या अल्प गरीबी आणि अशिक्षितता या सर्वांमुळे प्लॅस्टिक मनीच्या व्यापक व्यवहारावर मर्यादा येत आहेत.

**संशोधन पध्दती व संशोधनाची साधने :-**

कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्था हा शोधनिबंध लिहिताना विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर केला आहे. द्वितीयक साधन सामग्रीचा वापर केला आहे. पुस्तके, संदर्भग्रंथ, योजना मासिके, अर्थसंवादाचे विविध अंक, लोकराज्य व वर्तमानपत्रातून प्राप्त झालेली माहिती प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी वापरलेली आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने :-**

**१) ग्रामीण भागातील बँक शाखा :-** भागातील बँकींग शाखेचा अभ्यास केलातर ग्रामीण भागात पुरेशा बँका शाखा उघडण्याची गरज आहे. भारतात प्रति एक लाख लोकसंख्येमागे अवघा ०.०१ बँक शाखा असून जर्मनीत हे गुणोत्तर २.३ म्हणजे म्हणजे भारताच्या २३० पटीनी जास्त आहे. ग्रामीण भागात डेबिट व क्रेडीट कार्डच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी बँक संस्थेत वाढ होणे आवश्यक आहे.

**२) डिजिटल साक्षरता वाढली पाहिजे :-** भारतात एकुण लोकसंख्येच्या ६८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. असंघटीत क्षेत्रात आजही रोखीने व्यवहार केला जातो. ग्रामीण भागात जवळजवळ ९५ टक्के व्यवहार हा रोखीने केला जातो. डिजिटल साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झाली तर लोक रोख व्यवहार कमी करून कॅशलेस व्यवहार करतील.

**३) ग्रामीण भागातील इंटरनेट व मोबाईल सेवा सुविधा :-** डिजिटल व्यवहारात वाढ होण्यासाठी इंटरनेट सेवा सुविधेत वाढ झाली पाहिजे. ग्रामीण भागात इंटरनेट सेवा सुविधा अपुरी आहे. तसेच गरीबी, निरक्षरता या समस्या आहेत. ग्रामीण भागात आजही एटीएमचा वापर प्रामुख्याने रोखीने व्यवहार म्हणजे पैसे काढण्यासाठी होतो. तसेच कार्डच्या माध्यमातून व्यवहार करण्याची संख्या ही शहरी-निमशहरी भागात मोठ्या प्रमाणात आहे. ग्रामीण भागात त्याची खूप कमतरता आहे.

**४) वस्तुविनिमय अर्थ व्यवस्था :-** ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण अल्प आहे. ग्रामीण भागात असंघटीत क्षेत्रात वस्तुविनिमय पध्दतीनुसार व्यवहार होतात. वस्तुच्या मोबदल्यात वस्तू दिली जाते व घेतली जाते व व्यवहार रोखीने केले जातात. भारताची तुलना इतर देशांशी केल्यास असे दिसून येते की, भारतीय अर्थव्यवस्थेत चलनाचे प्रमाण बहुतेक विकसनशील आणि विकसित राष्ट्रापेक्षा जास्त आहे.

सन २०१५ मध्ये भारतात जीडीपीच्या १२.३ टक्के चलनाचे प्रमाण होते. स्वीडनमध्ये हे प्रमाण १.७३ टक्के एवढे होते. त्यातही ग्रामीण अर्थव्यवस्थेत वित्तीय साक्षरतेचे प्रमाण खूप कमी. कॅशलेस अर्थव्यवस्था स्वीकारताना या सर्वांचा सामना करावा लागणार आहे.

**५) कॅशलेस साधणारी माहिती नाही :-** भारताची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ८३.३० कोटी आहे. हे प्रमाण ६८.८४ टक्के आहे. तसेच खेड्याची संख्या ६ लाख ३८ हजार खेड्यात राहते. आजमितीस ग्रामीण भागात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या केवळ अकरा कोटी आहे. तसेच एन.ई.एफ.टी., आर.टी.जी.एस., ई-वॉलेट्स, युनिव्हर्सल पेमेंट, इंटरफेस, सीएससी (कॉमन सर्व्हिस सेंटर), यु.एस.एस.डी. (अन स्ट्रक्चरड सप्लिमेंटरी सर्व्हिस डेटा) हे शब्द त्यांना माहित नाहीत. या साधनाची व व्यवहाराची त्यांना माहिती होणे आवश्यक आहे.

**६) उपकरणाची कमतरता व इंटरनेट कव्हरेजचा वेग कमी :-** कॅशलेस अर्थव्यवस्था स्वीकारताना पीओएस मशीनद्वारे व्यवहार, मोबाईलधारक व इंटरनेट धारकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असली तरी देशातील ग्रामीण भागात इंटरनेट कव्हरेज आणि वेग हा जगाच्या मानाने फारच मागास आहे.

खालील तालिकेत पॉईंट ऑफ सेल (पी.ओ.एस.) मशीनचे २०११-२०१५ मधील एक लाख लोकसंख्येमागे प्रमाण दाखविलेले आहे.

**तक्ता क्रमांक १.१**

**पॉईंट ऑफ सेल (पीओएस) मशिनचे २०११-१५ मधील एक लाख लोकसंख्येमागे प्रमाण**

| अ.क्र. | देश | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ब्राझिल | १७,८११ | २०,५३१ | २२,१४६ | २४,८६७ | २५,२४१ |
| २. | चीन | ३५४२ | ५७७० | ७८१४ | ११,६५० | १६,६०२ |
| ३. | भारत | ५५० | ६९५ | ८६५ | ८८९ | १,०८० |
| ४. | स्वीडन | २२,१६७ | २०,८३७ | २०,३८० | २०,३०४ | १८,६६० |
| ५. | इग्लंड | २१,४९९ | २५,७३२ | २५,८०० | २६,३४६ | ३०,०७८ |

**संदर्भ :- योजना फेब्रुवारी २०१७ (पृष्ठ - २८)**

वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, भारतात तंत्रज्ञानावर आधारीत पायाभूत सुविधांची संख्या खूप कमी असून तिचा वापर कसा करावा याचे ज्ञान ग्रामीण भागात खूप कमी लोकाकडे आहे.

**७) रोजगारावरील खर्च रोखीनेच केला जातो :-** भारतीय अर्थव्यवस्थेत असंघटीत क्षेत्रात रोजगार निर्मितीचे प्रमाण व्यापक आहे. रोजगारावरील खर्च हा रोखीने दिला जातो. धनादेश किंवा कॅशलेस व्यवहाराची इतर साधने वापरली जात नाहीत किंवा ते वापरण्याची सवय नाही. शेतकरी आपला माल रोखीने पैसे घेवून विकतात.

**कॅशलेस व्यवहार व ग्रामीण अर्थव्यवस्थेतील अनुकुल बदल :-**

१) रोख रहीत व्यवहाराकडून कॅशलेस व्यवहाराकडे वाटचाल करत असताना ग्रामीण लोकांना बँकींग व्यवहाराची सवय होत आहे. रोखरहीत व्यवहारामुळे पूर्वी बँकेने येण्यासही घाबरणारे लोक बँकेत खाते उघडत आहेत. सन २०१६ मध्ये शून्य रक्कम असलेली ४५,६३२ जनधन खाती होती. त्यात २६ नोव्हेंबर २०१६ मध्ये वाढ होवून ७२,७४३ वर आली आहेत. याचा अर्थ बँक व्यवसायची सवय लोकांना होत आहे.

**२) सरकारी योजनांची अंमलबजावणी बँकमार्फत :-** सरकारी योजनांची अंमलबजावणी बँकींग व्यवसायामार्फत केली जात असल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी बँकेत जावून खाते उघडत आहे. विविध प्रकारची अनुदाने पिकविमा रकमेची रक्कम थेट शेतकऱ्याच्या खात्यात जमा होत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार, लाचलुचपतीचे प्रमाण कमी झाले आहे.

**३) प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल योजनेमुळे आर्थिक साक्षरतेत वाढ :-** केंद्रिय अर्थमंत्र्यांनी २०१६-१७ या अर्थसंकल्पात ग्रामीण भागाच्या विकासासाठी डिजिटल सरकार अभियान सुरू केले आहे. यासाठी एकुण २,३५१ कोटी रुपयाची तरतुद केलेली आहे. या अभियानात अभ्याक्रम युनिफाईड पेमेंट इंटरकॉम (यु.पी.आय.) अन्स्ट्रक्चर्ड सप्लिमेंटरी सर्व्हिस डेटा (यु.एस.एस.डी.) आधार सक्षम देयक प्रणाली (ए.ई.पी.एस.) इत्यादी रोकडरहित व्यवहार प्रणालींचा वापरदेखील शिकविण्यात येणार आहे.

**शोधनिंबधाचे निष्कर्ष :-**

कॅशलेस व्यवहार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या शोधनिबंधाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१) ग्रामीण अर्थव्यवस्थेत कॅशलेस व्यवहाराला सुरूवात होत आहे.

२) सरकारच्या विविध योजनांच्या कॅशलेस व्यवहाराचा प्रभावीपणे वापर होताना दिसून येत आहे.

३) ग्रामीण डिजिटल योजनेमुळे ग्रामीण भागात आर्थिक साक्षरतेत वाढत होत आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) योजना अंक, फेब्रुवारी २०१८

२) अर्थ संवाद अंक, जुलै-सप्टेंबर २०१८

३) बुलेटिन ऑफ युनिक ॲकेडमी, २ मे २०१७